महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य संचालनालय
जुने सचिवालय, पहिला मजला, विस्तार भवन, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२
वेबसाईट: www.mahasanskruti.org
दूरध्वनी क्र ०२२: २२८४२६७०/३४ , २२०४३५५०/७१
ई-मेल :mahaculture@gmail.com

---

**दिनांक ३ ऑक्टोबर २०२३**

## प्रजासत्ताक दिन नवी दिल्ली चित्ररथ संचलन २०२४

## जाहिर प्रकटन / आवेदन

प्रतिवर्षी प्रजासत्ताक दिनानिमित्त संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून राजपथ, नवी दिल्ली येथे चित्ररथ संचलनाचे आयोजन करण्यात येते. या चित्ररथ संचलनात महाराष्ट्र राज्याचा समावेश असतो. सन २०२४ च्या नवी दिल्ली येथे आयोजित करावयाच्या चित्ररथ संचलनात महाराष्ट्र राज्याच्या चित्ररथाचा विषय निवडीबाबत लवकरच बैठक आयोजन प्रस्तावित आहे. खालील विषयावर संरक्षण मंत्रालयाच्या तज्ञ समितीसमोर विषयांचे सादरीकरण दरवर्षी करावयाचे असते.

१) राज्यातील महत्वाच्या ऐतिहासिक घटना

२) सणसमारंभ सादरीकरण

३) पुरातत्वीय वास्तू अथवा संस्कृती आणि त्याकाळचे जीवनमान

४) राज्यातील महत्वाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या योजना, प्रकल्प ज्यामध्ये शासनाने उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. किंवा सामाजिक जीवनमान उंचाविले आहे.

५) पर्यावरण.

६) भविष्यातील योजना.

सन २०२४ या वर्षी चित्ररथाच्या आयोजनात चित्ररथाच्या संकल्पना व डिझाईन कलाकार व नागरी सहभागातून मागविण्यास कळविले आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्याची चित्ररथ सादरीकरणात कोणती संकल्पना असावी यासाठी नागरी सहभागातून या वर्षी सर्व कलाकार/तज्ञ/जाणकार यांच्याकडून चित्ररथ संकल्पना तसेच संकल्पना चित्र मागविण्यात येत आहे. इच्छूक सर्व संबधितांनी आपल्या सूचना/ संकल्पना या कार्यालयाच्या festivalbranch१२३@gmail.com या ईमेल आयडीवर दिनांक २० ऑक्टोबर २०२३ पर्यंत पाठवाव्यात असे आवाहन करण्यात येत आहे.

सही/-

संचालक

सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई